अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# महागाई, नोकर-भांडवलशाहीची अनौरस संतती

देशासह महाराष्ट्राच्या अनेक भागात पावसाने दडी मारली आहे. यंदा पाऊस उशीरा आणि नेहमीपेक्षा कमी असेल, असा अंदाज हवामान खात्याने यापूर्वीच व्यक्त केला होता. परंतु हा अंदाज सुरुवातीच्या काळातच एवढा खरा ठरेल असे वाटत नव्हते. निसर्गाचा कोणालाही भरवसा देत नाही. आज गायब झालेला पाऊस जुलैपासून कदाचित सरासरीपेक्षा जास्तही पडू शकतो पावसाचा असा बेभरवशाचा व्यवहार सुरू असताना तिकडे दिल्लीतल्या नव्या खेळाडूंचा राज्यकारभारही बेभरवशाचा वाटू लागला आहे. दुष्काळात तेरावा महिना या म्हणीप्रमाणे महागाईचा नवा भडीमार नव्या सरकारने सुरू केला आहे. रेल्वे दरवाढी पाठोपाठ आता साखर, गॅस, केरोसिन यांच्याही किंमती वाढणार आहेत. आपले सरकार गरिबांचे सरकार असेल अशी मखलाशी करून सत्तेवर आलेले मोदी सरकार श्रीमंतांचे वारसदार ठरेल की काय अशी भीती वाटू लागली आहे. जी महागाई मनमोहन सिंग सरकारला नियंत्रणात आणता आली नाही ती नरेंद्र मोदी आपली खास शैली वापरून काबूत ठेवतील अशी अपेक्षा होती. परंतु तशी फारशी चिन्हे दिसत नाहीत. सरकार कोणतेही असो महागाई जर रोखली जाणार नसेल तर मागचे दिल्लीतले खास अर्थकारण समजून घ्यावे लागेल. मोदींना सत्ता हाती घेऊन एक महिनाही होत नाही तेवढ्यातच हा महागाईचा एकेक आसूड उगवला जात असेल तर मागे दिल्लीतल्या सत्तेभोवती फिरणाऱ्या नोकरशहा-कंत्राटदार आणि भांडवलदारांच्या लॉबीने आपल्या करिष्म्याला सुरुवात केल्याचे सिद्ध होते. दिल्लीत नव्याने आलेल्या सत्ताधाऱ्यांच्या विनाअनुभवाचा तातडीने फायदा घेण्याचे या लॉबीने सुरू केले आहे. सत्ता हा एक असा सारीपाट आहे की, तिथे राजालाही नामोहरण करण्याचे काम साधी-साधी प्यादी सुद्धा करतात. दिल्लीच्या राजकारणात कोणाला खरी वाटणारी अशी भांडवलदार, नोकरशहा आणि कंत्राटदारांची लॉबी सतत कार्यरत असते. त्यांना कोणाचे सरकार येते आणि कोणाचे जाते याच्याशी काहीही घेणे-देणे नसते. गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी धोरणे कशी वाकवायची सरकारला कसे आणि कोणते निर्णय घ्यायला लावायचे हे ठरविण्याचे काम ही लॉबी परंपरेने करीत आली आहे. या लॉबीचे बुरुज सत्तेच्या दरबारात जागोजागी भक्कमपणे उभे आहेत. त्याला धक्का लावणे अजून कोणालाही शक्य झालेले नाही. आणि म्हणूनच मोदी सरकारला येऊन महिना होण्याच्या आतच या लॉबीने आपली पकड कशी घट्ट आहे हे दाखवून दिले. रेल्वेदरवाढीपाठोपाठ आता अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढी अजेंडाही या लॉबीने तयार ठेवला आहे.

## वाहत्या पाण्यात हात धुणारे मंत्री

प्रामुख्याने गेल्या दहा वर्षांत महागाईने जो कळस गाठला आहे त्यामागे कोणतेही मोठे अर्थकारण नसून दिल्लीत बसलेले नोकरशहा आणि भांडवलदार यांच्यातील घनिष्ट संबंध कारणीभूत आहेत. आमचे तर असे स्पष्ट मत आहे की सरकारी तिजोरी सतत साफ करण्यासाठी एका विशिष्ट पद्धतीने ही लॉबी काम करते. परिस्थितीचा बागुलबुवा निर्माण करून प्रस्ताव आणि धोरणे तयार करते आणि सत्ताधाऱ्यांना व्यवस्थितपणे हाताशी धरून ते मंजूर करून घेत महागाई कोणत्याही मोठ्या अर्थकारणाचा परिणाम नाही तर ती नोकरशाही आणि भांडवलशाहीच्या अनैतिक संबंधातून जन्माला येणारी अनौरस संतती असते. जी जनतेला नाईलाजास्तव सांभाळावी लागते. किंवा सहन करावी लागते. सत्ताधारी किंवा दिल्लीतले राजकारणी या लॉबीच्या ताटाखालची मांजरं असतात. एक तर यांना प्रामाणिकपणे अथवा निस्वार्थीपणे सत्ता राबवायची नसते उलट सत्ता मिळाली आहे. ती कायम राहण्याची शक्यता नाही असे समजून वाहत्या पाण्यात व्यवस्थितपणे आपले हात धुवून घेण्याचा मोलाचा सल्ला ही लॉबी त्यांना देते. अनेक वर्षे दिल्लीच्या सत्तेच्या गल्लीत मुक्काम ठोकलेल्या लॉबीला सगळ्या खाचा-खोचा माहीत असतात. राजकारण्यांच्या अज्ञानाचा किंवा अतिज्ञानाचा गैरफायदा घेतला जातो. आतादेखील मोदींसारख्या कणखर नेतृत्वाचे सरकार येऊन या लॉबीवर त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही. उलट ऑपला प्रभाव दाखवण्यात ही लॉबी यशस्वी झाली आहे.

## पंचतारांकीत हॉटेलात निर्णय

ज्यांना दिल्लीचे राजकारण माहिती आहे त्यांना ही गोष्ट नवीन नाही. परंतु सरकारला एखादा निर्णय घेणे भाग पाडण्याची मोहिनी विद्या या लॉबीकडे असते. त्यासाठी प्रसारमाध्यमे काही तगडे स्तंभलेखन करणारे यांना हाताशी धरले जाते. माहिती पुरविली जाते आणि अनेक भांडवलदार-कंत्राटदार आपले प्रॉडक्ट सरकारच्या गळी मारण्याचे कारस्थान शिजवले जाते. थोडे नीट निरीक्षण किंवा अभ्यास केला तर ते सहजपणे लक्षात येते. जेव्हा एकाच विषयावर एकाचवेळी अनेक प्रसारमाध्यमांतून चर्चा सुरू केली जाते तेव्हा हमखासपणे पुढच्या महिनाभरात त्याबाबतचा निर्णय सरकार घेते मग संरक्षण विभागासाठी गरज नसलेल्या सामुग्रीची आवश्यकता निर्माण करणारे लिखाण सुरू होते किंवा साखरेसारख्या जीवनावश्यक वस्तुचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जातो. शुगर लॉबी याच नोकरशहांना हाताशी धरते. दिल्लीतल्या मोठमोठ्या पंचातारांकीत हॉटेलात त्यांच्या पार्ट्या होतात आणि आपोआप काही प्रस्ताव-धोरणे असणाऱ्या फायली मंत्र्यांच्या टेबलावर विराजमान होतात. आता होणारी साखर दरवाढ ही सुद्धा शुगर लॉबी आणि नोकरशहांची लॉबी यांच्यातल्या मधुरसंबंधांचे फळ आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कोणतेही सरकार किंवा मंत्री स्वत: धोरण किंवा निर्णयांचा अभ्यास करीत नाहीत. सरकार-नोकरशाहीच्या बाहेर असलेल्या तज्ज्ञांशी चर्चाही करीत नाही. नोकरशहांनी केलेल्या प्रस्तावांना वस्तुस्थिती मानतो. मंत्र्यांना आपली मर्जी आणि मस्ती सांभाळली जात असल्याने ते खूश राहतात. परंतु यातून सरकारी तिजोरी लुटली जाते. सतत तूट दाखविली जाते. महागाईच्या अनौरस संतती जन्माला घालण्याचे काम अविरत सुरू राहते. दिल्लीतल्या या लॉबीचे रहस्य उलगडल्याशिवाय मोदींना मोकळेपणे कामच करता येणार नाही.